जा.क्र./वि.प्र.७/कृउसं/कृयांयो/प्रा/ ४९६ /२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -५ दि.११ /०५/२०१२

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक,**
**---------------- विभाग -----------------**

**विषयः- कृषि यांत्रिकीकरणास प्रशिक्षण, तपासणी व प्रात्यक्षिकांव्दारे प्रोत्साहन देवूनबळकटीकरणाची योजना**
**---------------------------------------------------------**
**मार्गदर्शक सूचना.**

कृषि क्षेत्रातील मजूर समस्येवर उपाय योजना म्हणून आधुनिकीकरण, अद्यावत तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर व पर्यायाने शेती व्यवसाय अधिक कार्यक्षमतेने, अचुकतेने व व्यावहारीक दृष्ट्या परवडणारा होण्याच्या दृष्टीने संशोधनाद्वारे विकसित व उपयुक्त ठरलेल्या औजारे व उपकरणांचा योग्यरित्या वापर करण्यासाठी तसेच आत्याधुनिक व विकसीत यंत्र सामुग्री, औजारे व उपकरणे यांची शेतक-यांना माहीती व्हावी, त्यांची हाताळणी व व्यवस्थापन करता यावे या उद्देशाने केंद्र पुरस्कृत **कृषि यांत्रिकीकरणास प्रशिक्षण, तपासणी व प्रात्यक्षिकांव्दारे प्रोत्साहन देवून बळकटीकरणाची योजनेचा** प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. सदरहू योजनेस सन २०११-१२ करिता रु. ३.९० कोटी निधीस मंजूरी प्राप्त असून रु. १.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर निधीतून महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या औजारांची प्रात्यक्षिके तालुका बिजगुणन केंद्र येथे आयोजीत करण्यात यावीत. या योजनेची उचित अंमलबजावणी करणेसाठी आयुक्तालय स्तरावरुन योजनेच्या मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत.

**सोबतः** वरीलप्रमाणे
पृ.सं.

**कृषि संचालक ( विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे**

प्रतः

१. मा.प्रधान सचिव, कृषि व पणन , मंत्रालय, मुंबई -३२.
२. उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२. .
३. कक्ष अधिकारी, ४ अे,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबअी-२५.
६. कृषि सहसंचालक वि.प्र.-२ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ---------------- (सर्व)
६. कृषि विकास अधिकारी ---------------- (सर्व)

**कृषि यांत्रिकीकरणास प्रशिक्षण, तपासणी व प्रात्यक्षिकांव्दारे प्रोत्साहन देवून बळकटीकरणाची योजना मार्गदर्शक सुचना.**

**<u>पार्श्वभुमिः-</u>**

कृषि क्षेत्रातील मजूर समस्या, अधुनिकीकरण, अद्यावत तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर व पर्यायाने शेती व्यवसाय अधिक कार्यक्षमतेने, अचुकतेने व व्यावहारीक दृष्ट्या परवडणारा होण्यासाठी संशोधनाद्वारे विकसीत व उपयुक्त ठरलेल्या औजारे व उपकरणांचा योग्यरित्या वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. या अत्याधुनिक व विकसीत यंत्र सामुग्री, औजारे व उपकरणे यांची शेतक-यांना माहीती व्हावी, त्यांची हाताळणी, व्यवस्थापन याबाबत आत्मविश्वास निर्माण व्हावा या दृष्टीने केंद्र पुरस्कृत **कृषि यांत्रिकीकरणास प्रशिक्षण, तपासणी व प्रात्यक्षिकांव्दारे प्रोत्साहन देवून बळकटीकरणाची योजना** या योजनेखाली प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. त्यासाठी सन २०११-१२ करिता रु.३.९० कोटी निधीस मंजूरी दिली असून रु. १.०० कोटी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर निधीतून महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत पुरविण्यात येणा-या औजारांची प्रात्यक्षिके तालुका बिजगुणन केंद्र येथे आयोजीत करावीत.

**<u>उद्देश</u> :-**

१) नवीन तंत्रज्ञानावर आधारीत औजारांची शेतक-यांना माहिती देणे.

२) सदर औजारांची उपयुक्तता प्रात्यक्षिकांव्दारे शेतक-यांना दाखविणे व त्यांचे वापरासाठी उद्युक्त करणे.

३) कृषि यांत्रिकीकरणासाठी प्रोत्साहन देणे आणि बळकटीकरण करणे.

**<u>लाभार्थी शेतक-यांची प्रात्यक्षिकासाठी निवड करणे.</u>**

१) लाभार्थी शेतकरी हा सुशिक्षित असावा.

२) कृषि यांत्रिकीकरण योजनेमधील लाभधारक असावा.

३) प्रक्षेत्राच्या जवळपासचे गावातील शेतक-यांची शक्यतो निवड करावी.

४) केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, महिला व अपंग प्रात्यक्षि कार्यक्रमास उपस्थित राहतील, याची दक्षता घ्यावी.

५) शेतक-यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेशी संपर्क साधून कार्यवाही करावी.

**<u>अंमलबजावणी व कार्यपध्दती</u> :-**

१) विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील तालुका बीज गुणन प्रक्षेत्रनिहाय व औजारे/सयंत्रे निहाय आराखडा तयार करावा व कृषि आयुक्तालयास सादर करून त्या प्रमाणे कार्यक्रम राबवावा. (विभागासाठी औजारे संख्या व आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिकांची संख्या सोबत सहपत्रित करण्यात आली आहे. प्रपत्र -१)

२) केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार प्रती प्रात्यक्षिकासाठी असलेल्या निधीच्या मर्यादेत प्रात्यक्षिके आयोजित करावित. या निधीतून प्रात्यक्षिकासाठी वापरण्यात येणा-या औजारे / सयंत्रे यासाठी इंधन खर्च व चालकाच्या मजूरीचा खर्च भागविण्यात यावा. (प्रपत्र -२) प्रक्षेत्र निहाय जिल्ह्यातील एकुण प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या निधीची मागणी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे करावी.

३) प्रक्षेत्रावरील पीक पध्दतीनुरूप व सदर औजारे /सयंत्रे यांचे वापरानुसार प्रत्यक्ष शेतावर प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

४) प्रात्यक्षिकांसाठी प्रक्षेत्रनिहाय वेळापत्रक करुन ते महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाला कळवावे व त्यांचेकडील तंत्रज्ञास बोलावून उपस्थित शेतक-यांना प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे.

५) औजारे/संयंत्रे वापरण्याच्या दृष्टीने, त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने औजारे प्रात्यक्षिकांच्यावेळी त्यांचेकडील सदर औजारे संयंत्रे हाताळण्यातील जाणकार तंत्रज्ञास पाठवावे. त्यांनी प्रत्यक्ष औजारे संयंत्रांची हाताळणी व देखभाल याबाबत शेतक-यांना माहिती देऊन शंका निरसन करावे.

६) प्रात्यक्षिंकांसाठी शेतक-यांना आमंत्रित करुन कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी. प्रात्यक्षिक दाखवण्याची जबाबदारी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाची राहील.

..२..

७) प्रत्येक औजारांच्या प्रात्यक्षिकात साधारण २० ते २५ शेतकरी असावेत. प्रत्येक प्रात्यक्षिकाचा कालावधी पिकाच्या अवस्थेनुरुप योग्य तो ठरवावा.

८) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यात आयोजित प्रात्यक्षिकांसाठी खर्चाचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई २५ यांचेकडे अनुदान मागणीसाठी सादर करावा. व महामंडळाने मंजूर अनुदान मर्यादेच्या आधीन राहून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांना अनुदान उपलब्ध करुन द्यावे.

९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यात घेतलेल्या प्रात्यक्षिकांचा प्रक्षेत्रनिहाय अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**<u>महत्वाच्या सुचना :-</u>**

**१) सदर योजनेसाठी उपलब्ध सर्व निधी महामंडळाकडे वर्ग केलेला असून त्यातून औजारे / संयंत्रे खरेदी व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबवावयाचा आहे. जिल्हा / विभाग स्तरावर वेगळा निधी देण्यात येणार नाही.**

**२) प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणारी नवीन औजारे/सयंत्रे दिलेल्या मानकाप्रमाणेच व सुस्थीतीत तसेच शेतात वापरण्यास योग्य आहेत याची खात्री उपविभागीय कृषि अधिकारी/ कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय यांनी करावी तसा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा.**

**३) प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणारी नवीन औजारे/सयंत्रे यांची प्रक्षेत्रावरील जडसंग्रह नोंदवहीत नोंद घेण्यात यावी. औजारे/सयंत्रे यांची देखभाल ठेवून वापर करण्याची जबाबदारी संबंधित प्रक्षेत्र प्रमुखाची व उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील.**

**४) औजारे प्रक्षेत्रावर सुस्थितीत प्राप्त झाल्याचे व त्यांची जडसंग्रह वहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि आयुक्तालयास तात्काळ पाठवावे. स्वतंत्र नोंदवहीत प्रक्षेत्रावर झालेल्या प्रात्यक्षिकांची औजारनिहाय नोंद ठेवण्यात यावी.**

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११००५,**

--------------X-----------------